# मे.जयस्वाल निको इंडस्ट्रीज लिमिटेड, धोबीटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया या लोहखनिज उत्खन्न उद्योगाचे दि. ७/०८/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावनी ईतिवृत्त

मे. जयस्वाल निको इंडस्ट्रीज लिमिटेड धोबीटोला ता. आमगाव जिल्हा. गोंदिया या उद्योगाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावनी दि. ०७/०८/२०१९ रोजी सदर उद्योगाच्या परिसरात सकाळी ११.०० वाजता घेण्यात आली होती. सदर जाहीर लोकसुनावनीकरीता श्री.हरीश धार्मीक, निवासी जिल्हाधिकारी, गोंदिया हे सुनावणीचे अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते. श्री.अशोक लटारे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, प्रतिनिधी म्हणुन उपस्थित होते. श्री. राहुल वानखेडे प्रादेशिक अधिकारी नागपुर हे सुनावणीचे सदस्य म्हणुन उपस्थित होते. तसेच श्री. आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी भंडारा, हे सदर जाहीर लोकसुनावनीचे समन्वयक म्हणुन उपस्थित होते. सदर जाहीर लोकसुनावनीस धोबीटोला ग्रामवासी लोकप्रतिनिधि मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. उपस्थितांचि हजेरी / स्वाक्षरी घेण्यात आली असून सोबत जोडलेले आहे. (सहपत्र)

मे. जयस्वाल निको इंडस्ट्रीज लिमिटेड धोबीटोला ता. आमगाव जिल्हा. गोंदिया या कंपनी द्वारे लोहखनिज उत्खनन विस्तारिकरण करण्यासाठी वने व पर्यावरण, हवामान बदल मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार जाहीर लोकसुनावनीसाठी म. प्र. नि. मंडळाकड़े दि. ०२/०४/२०१९ रोजी अर्ज सादर करण्यात आला होता. त्यानुसार जिल्हाधिकारी गोंदिया यांना दि. १५/०४/२०१९ रोजी पत्रान्वये सुनावनीची तारिख व वेळ निश्चित करण्यासंबंधी विनंती करण्यात आली. त्यानुसार लोकसुनावणीची तारीख दि. 7/08/2019 वेळ सकाळी 11.00 वाजता ग्रामपंचायत कार्यालय, धोबीटोला, ता.आमगांव, जि.गोंदिया येथे निश्चित करण्यात आली. याबाबत म. प्र. नि. मंडळ, मुख्यालयाचे पत्र क्र. BO/JD (WPC) PHB-२७८२, दि. २३/०७/२०१९ च्या पत्रान्वये कार्यालयीन आदेश जारी केला होता. (सहपत्र जोडले आहे)

सदर जाहीर लोकसुनावनीबाबत दि. ०४/०७/२०१९ रोजीच्या स्थानिक वृत्तपत्र दैनिक सकाळ (मराठी) आणि दैनिक हितवाद (ईंग्रजी) मधे सुनावनीबाबतची जाहिरात ३० दिवसांच्या मुदतिसह प्रसिद्ध करण्यात येऊन जनतेकड़े आक्षेप मागविन्यात आले होते. (सहपत्र ) उद्योगाने मंडळास जाहीर लोकसुनावनीकरीता सादर केलेला मसुदा अभ्यास अहवाल, कार्यकारी सारांश पुढील ठिकाणी जनतेच्या माहितीसाठी तसेच अभ्यासाकरीता ठेवण्यात आले होते.

- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
- जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया
- जिल्हापरिषद, गोंदिया
- जिल्हा औध्योगिक केंद्र, गोंदिया
- म. प्र. नि. मंडळ, सायन मुंबई

- प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, नागपुर
- उप-प्रादेशिक कार्यालय, म. प्र. नि. मंडळ, भंडारा
- ग्रा. पं. कार्यालय धोबीटोला, ता. आमगाव, जिल्हा. गोंदिया
- प्रादेशिक कार्यालय वने व पर्यावरण मंत्रालय, वातावरन बदल, तळमजला पूर्वविंग, नवीन सचिवालय बिल्डिंग, सिविल लाईन नागपुर

तसेच सदर अभ्यास अहवालाची प्रत मंडळाचे www.mpcb.gov.in या संकेत स्थळावर सुद्धा उपलब्ध करण्यात आली होती. जाहीर लोकसुनावनी घेण्याच्या आधी या कार्यालयास एकूण ४ लेखी निवेदन / आक्षेप प्राप्त झाले होते. (सोबत जोडलेले आहे)

जनसुनावनीसाठी श्री. अशोक लटारे अतिरिक्त जिल्हाधिकारी गोंदिया, हजर होते आणि श्री. हरीश धार्मिक निवासी उप-जिल्हाधिकारी गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली जनसुनावनीची प्रक्रिया ११ वाजता सुरू करण्यात आली. श्री. आनंद कटोले उप-प्रादेशिक अधिकारी भंडारा, यांनी मा. अध्यक्षांची परवानगी घेऊन जनसुनावनीचे प्रास्ताविक केले. त्या दरम्यान त्यांनी जाहीर लोकसुनावनी प्रक्रियेची पूर्ण माहिती दिली. लोकसुनावनीचे ईतिवृत्त, प्राप्तलेखी आक्षेप व वीडियो रेकॉर्डिंग पुढील कार्यवाहिसाठी मंत्रालयास सादर करण्यात येत असल्याचे सांगितले आणि सदर प्रकल्पाविषयीचे सादरीकरन करण्यासाठी उद्योगाचे प्रतिनिधिन्ना आमंत्रित केले.

तद्नंतर जयस्वाल निको इंडस्ट्रीजचे तांत्रिक सल्लागार श्री. शांतनु पुरानिक यांनी पॉवर पॉइंट प्रेजेंटेशन सादरीकरण करून सदरील उद्योगाविषयी विस्तृत माहिती देण्यात आली. यामधे सदरील उद्योग खुली खदान (open caste) प्रकारे केली जाणार असल्याचे सांगितले व त्यांचे खनन क्षेत्रफळ २.६१ हे. असल्याचे सांगितले. सध्या स्थितीत कंपनी ची उत्पादन क्षमता २५०० टन/वर्ष असून त्याचे विस्तारिकरण ७५०० टन/वर्ष पर्यंत वाढविन्याकरिता अनुमति मिळवीणे आवश्यक असल्याचे सांगितले.

तद्नंतर श्री. आनंद काटोले उप-प्रादेशिक अधिकारी भंडारा, यांनी उपस्थित असलेल्या नागरिकाना शंकेचे निरसन करुन घेण्यास आव्हान केले. त्यानुसार पुढील नागरिकानी तसेच स्थानिक कार्यकरत्यांनकडून शंका/प्रश्न उपस्थित करण्यात आले.

१) मेघनाथ पुंडे ( माजी सरपंच ग्रा. पं. सुरकुड़ा ) यांनी असे विचारले की, या कंपनी द्वारे अतिरिक्त रोजगार निर्मिति होईल का ?

२) श्री. हनुमंत कोदुजी वट्टी यांनी असे नमूद केले की, सदरील खान कामाकरिता स्थानिक महिलांसाठी रोजगाराच्या उपाय योजना व तरुण शिक्षित विध्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यात येणार का असे विचारण्यात आले ?

३) श्रीमति धनवंताबाई वट्टी सरपंच ग्रा. पं. सुरकुड़ा ( धोबीटोला सुरकुड़ा आणि मल्लिटोला ) यांनी असे नमूद केले की, सदरील खानीचे खनन काम करण्यासाठी व त्याचे विस्तारिकरण करण्यासाठी आजूबाजूला असलेली घरे जर हट्वील्यास त्या बाबतचा मोबादला मिळनार का ? व स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येणार का ? असे विचारण्यात आले.

४) श्री. चैतराम मेश्राम यांनी असे सदरील खानकामाच्या खनिज उत्पनन प्रक्रियेमुळे जमीनीची दलदल होण्याची भीती व्यक्त करून त्या विषयी मार्गदर्शन करण्याची विनंती केली तसेच स्थानिक तरूण मुलांना कंपनीत नोकरी मिळावी याची मागणी केली.

५) भोजराज नान्हे यांनी सदरील कंपनीच्या उत्खननामुळे गावाचे हाल होतील व धोबीटोला ग्रामवासियांना याचा धोका होईल म्हणून माझा विरोध असल्याचे सांगितले.

६) श्री सुनंदा रेड्डी धरित्री पर्यावरण प्रशिक्षण संस्था यांनी समोर येऊन सदरील खान कामाकारिता पाठिंबा जाहीर केला.

यानंतर मे. जयस्वाल निको इंडस्ट्रीज लिमिटेड धोबीटोला त. आमगाव जिल्हा. गोंदिया चे प्रतिनिधि श्री. सुशांत भुरे आणि कंपनीचे तांत्रिक सल्लागार श्री. शांतनु पुरांनिक यांनी ग्रामवासियांनी केलेल्या शंकांचा निरसन केले. त्यानुसार सदरील कंपनी द्वारे या प्रकल्पाद्वारे अतिरिक्त रोजगार निर्मिति होईल तसेच स्थानिक लोकांनाच प्राधान्य देण्यात येईल तसेच महिलान्ना बचत गट स्थापन करण्यासाठी मदत केली जाईल , युवकांना MS-CIT ची ट्रेनिंग प्रोग्राम् देण्यात येईल असे सांगितले. तसेच कंपनी पासून स्थानिक लोकांची घरे किंव्हा ईतर वस्तु हटविले जाणार नाही असे सांगितले. तसेच दलदल न होण्याबाबत खदानीच्या बाजूने Garland Development करुन पावसाचे पानी खान क्षेत्राच्या बाहेर जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे सांगितले. याच कॉर्पोरेट एन्व्हायरोंमेंट Responsibility बद्दल सांगून खदानीची एकूण किम्मत १.१ Cr असल्याचे सांगून त्याचे १% यावर खर्च करण्यात येईल त्याप्रमाणे मा. जिल्हाधिकारी गोंदिया यांचे मार्गदर्शना नुसार त्याची तरतूद केली जाईल असे सांगितले.

श्री. हरीश धार्मिक निवासी उप-जिल्हाधिकारी गोंदिया यांनी असे सांगितले की, सर्व अटी व शर्ती च्या पुर्तता बहुतांशवेळा होत नसल्याने स्थानिक ग्रामस्थ व परिसरातील रहिवाशी हे खानकाम संबन्धित विभागाशी संपर्क न करता जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठपुरवा करतात त्याकारिता स्थानिक लोकांनी कोणत्या विभागाकडे तक्रार करावी असे विचारले.

या प्रश्नावर प्रकल्प धारकाने सांगितले की या कामाकरीता भारतीय खान ब्युरो ची IBM कडून मान्यता घेणे आवश्यक असल्याने त्यांच्या मार्फत तपासणी करण्यात येते तसेच सबंधित विभाग उदा. म. प्र. नि. मंडळ नुसार पाहणी केली जाते असे सांगितले. MOF Clearance च्या पुरततेसाठी ६ महिना कालावधि दिला जातो तरी या प्रकरणी ग्रा. पं. सद्स्याकडुन लिखित स्वरूपाची तक्रार सादर केल्यास त्याचे निराकरन केले जाईल यासाठी कंपनी पर्यावरण शाखा केलेली आहे असे सांगितले. या अनुषंगाने श्री. राहुल वानखेडे प्रादेशिक अधिकारी नागपुर यांनी असे सांगितले की, सदरील कंपनी कोणत्या रस्त्याचा वापर वाहतुकीकरिता करणार , याची माहिती तसेच पर्यावरण शाखा बाबतची माहिती मंडळास सादर करण्यास सांगितले आणि प्रतेक ६ महीन्याने ग्राम मीटिंग घेऊन फंड उपयोगात आणावा व त्याची केलेल्या कामाची लिखित कॉपी जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया व म. प्र. नि. मंडळाकड़े सादर करण्याचे सांगितले.

त्यानंतर श्री. अशोक लटारे अतिरिक्त जिल्हाधिकारी गोंदिया यांनी असे सुचविले की, कंपनीच्या मार्फत पर्यावरणावर केल्या जाणाऱ्या खर्चाचे तसेच स्थानिक ग्रामवासियांबाबत केल्या जाणाऱ्या खर्चाचे नियोजन CSR स्कीम मधून करुन पर्यावरणाचा विकास कसा करता येईल याचा आढावा घ्यावा असे कंपनीच्या प्रतिनिधी यांना सुचविले.

श्री.राहुल वानखेडे, प्रादेशिक अधिकारी तथा सदस्य यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांच्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी केली व उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व योग्य ते मुद्दे उपस्थित केले व त्यांची नोंद घेण्यात आली आहे, असे कळविले. समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच उपस्थित नागरीकांचे व प्रतिनिधीचे आभार व्यक्त करून माननीय अध्यक्ष यांचे परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | |
|---|---|
| (आनंद काटोले)<br>प्रभारी, उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि.मंडळ, भंडारा व<br>समन्वयक, लोक सुनावणी समिती | (राहुल वानखेडे)<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि.मंडळ, नागपूर व<br>सदस्य, लोक सुनावणी समिती |
| (हरीश धार्मिक)<br>निवासी जिल्हाधिकारी, गोंदिया व<br>अध्यक्ष, लोक सुनावणी समिती | (अशाके लटारे)<br>अतिरिक्त जिल्हाधिकारी, गोंदिया |